# नागपूर महानगरपालिका, नागपूर
(आस्थापना विभाग)

जाहिरात क्र. 94 / ज.स. / 2021 | **थेट मुलाखत** | दि. 9 / 07 / 2021

नागपूर महानगरपालिकेतील विविध कामाची माहिती तथा प्रसिध्दी नागरीकांपर्यन्त पोहचविण्याच्या उद्देशाने "मिडीया समन्वयक" हे पद निव्वळ कंत्राटी तत्वावर प्रथमतः 6 महिन्याचे कालावधी करिता, एकमुस्त मानधन रू. 25,000/– वर भरावयाचे आहे. इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीकरिता आवश्यक कागदपत्रांसह दि. 22/07/2021 रोजी सकाळी 10 : 30 वाजता, अति. आयुक्त (शहर),नवीन प्रशासकीय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

| अ. क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| 1 | मिडीया समन्वयक | 01 | 50 वर्षे पेक्षा जास्त नसावी | 1) मान्यताप्राप्त विद्यापीठाची जनसंवाद विद्याविभागातील पदव्युत्तर (Post-Graduate) परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>2) पत्रकारितेच्या क्षेत्रातील बातमीदारीचा वृत्तपत्रातील 10 वर्षापेक्षा अधिक अनुभव आवश्यक (ग्रेड 1 वृत्तपत्रातील अनुभव असल्यास प्राधान्य)<br>3) वृत्त लिखाण, वृत्त संपादनात कौशल्य व अनुभव प्राप्त असावे.<br>4) मनपाच्या विविध विभागाच्या योजना, माहिती यावर लिखाणाचे कौशल्य असावे.<br>5) विविध विषयाचे आकलन व ज्ञान असावे.<br>6) नेतृत्वक्षमता आणि उत्कृष्ट जनसंपर्क, व्यवस्थापन आणि प्रशासन कौशल्य क्षेत्रातला अनुभव आवश्यक.<br>7) आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराचे कौशल्य असावे, समाजमाध्यमांची जाण असावी आणि समाजमाध्यमांवर सक्रीय असावा.<br>8) मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांवर प्रभुत्व असावे.<br>9) वयोमर्यादा कमाल 50 वर्षे असावी.<br>10) मनपाच्या कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |

उपरोक्त पदाकरिता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदांकरिता आवश्यक अर्हता / अटी / शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

हस्ता/–राधाकृष्णन बी.
आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

**Advt No : 94/PR**
**dt : 09/07/2021**

P/N/21/94